# *ANTI DOWRY MOVEMENT, BOMBAY.*

## *हुंडाविरोधीचळवळ, मुंबई*

*4/50 Vishnu Prasad 'B' Society, ShahajirajeMarg,Freedon Fighter MamashebKulkarniChowk,*
*Vile Parle (E) Mumbai 400 057.Tele.No.022-26836834 / 26836132.*

---

### *: साने गुरुजी युवा पुरस्कार :*

*मामासाहेबांनी युवा पिढीच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतला होता.युवा पिढी म्हणजे देशाचे भविष्य ! युवकांना अंधश्रद्धेपासून परावृत्त करण्यासाठी, त्यांच्या विचारांची दिशा विज्ञाननिष्ठीत व्हावी, आधुनिक युगात बलसागर भारत घडवण्याचे स्वप्न त्यांनी पहिले, यासाठी तरुणांनी सक्षम व्हावे म्हणून मामांनी आयुष्य वेचले. वयाच्या ९८व्या वर्षापर्यंत विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयातून ते जाणीव जागृतीसाठी, युवकांशी संवाद साधण्यासाठी, व्याख्यानांसाठी जात होते. मृत्यूपूर्वी जवळजवळ ३० ते ३५ वर्षाच्या दीर्घ काळात त्यांनी ५ हजारांहून अधिक युवा सक्षमीकरणाचे कार्यक्रम यशस्वी केले. या कार्यासाठी त्यांनी भारतभर प्रवास केला, महाराष्ट्र तर अक्षरशः पिंजून काढला. मामा साने गुरुजींचे विद्यार्थी / अनुयायी. गुरुजींचा प्रदीर्घ सहवास त्यांना लाभलेला आणि म्हणून हे सर्व शक्य झाले ते केवळ सानेगुरुजींच्या प्रेरणेने आणि आशीर्वादाने अशी मामासाहेबांची धारणा होती.*

*३ ऑक्टोबर २०११ रोजी त्यांना देवाज्ञा झाली. त्यानंतरचे वर्ष मामांच्या जन्मशताब्दीचे वर्ष होते. त्या निमित्ताने वर्ष २०१२-१३ पासून मामासाहेबांच्या स्मरणार्थ व साने गुरुजींच्या नावाने आम्ही साने गुरुजी युवा पुरस्कार दरवर्षी युवा दिनाचे निमित्ताने दोन युवकांना देतो. या पुरस्काराचे स्वरूप असते : मानधन रु.१०,०००/-, सन्मानपत्र, चांदीचे सन्मानचिन्ह, ग्रंथभेट, आणि खादीच्या सुताचा हार ( मामानी आजीवन खादी वापरली ते खरंच एकादशव्रताचे पालन करणारे गांधीवादी होते )या पुरस्काराचा संपूर्ण खर्च कुलकर्णी कुटुंबीयांतर्फे विशेषतः मामानी कुटुंबियांसाठी मागे ठेवलेल्या पुंजीतून केला जातो. मामा नेहमी म्हणत आपल्या स्वताःच्या मिळकतीतून कुटुंबाच्या चरितार्थासाठी लागणारा निधी वगळता उरलेला पैसा समाजाचा असतो आपण त्याचे केवळ विश्वस्त असतो.*

*गेल्या सात वर्षात **सोळा** असे पुरस्कार दिले गेले आहेत. त्यातील काही जणांच्या नावाचा उल्लेख करणे संयुक्तिक होईल.*



*<u>वर्ष १ ले</u> : (१ ) स्विटी प्रकाश पाटे – चाळीसगाव, जिल्हा जळगाव – एरोस्पेस इंजिनीअर.नासा **मध्ये** एका वर्षात दोन प्रोजेक्ट्स सादर करणारी पहिली भारतीय युवा वैज्ञानिक युवती. (जानेवारी २०१३)*

*(२ ) धीरज राजेंद्र जाधव - पुणे – इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर – नासाच्या मंगळयानातील संदेश यंत्रणेसाठी मोलाचे संशोधन. (जानेवारी २०१३)*

*(३ ) अलंकार शशिकांत कोतवाल - ठाणे – जागतिक स्तरावर सायन्स ऑलिम्पियाड **मध्ये** सुवर्ण पदक मिळवून भारतीय चमूला यश देणारा युवा वैज्ञानिक. (जानेवारी २०१३)*

*(४ ) जयश्री जानू खरपडे - वाडा, जिल्हा ठाणे – प्रतिकूल परिस्थितीत संघर्षमय जीवनात स्वतःचे मनोधैर्य वाढवून इतरांना प्रेरणा देणारी आदिवासी युवती (जानेवारी २०१३)*

*<u>वर्ष २ रे</u> : (५ ) सजल सुरेश कुलकर्णी - नागपूर – बायोटेकनॉलॉजिस्ट युवा वैज्ञानिक (जानेवारी २०१४)*

*(६ ) डॉ.प्रियदर्श तुरे : मेळघाट, अमरावती – जीवाची पर्वा न करता दुर्गम भागात वैद्यकीय सेवा पुरवणारा एक युवा डॉक्टर. (जानेवारी २०१४)*

*<u>वर्ष ३ रे</u> : (७ ) अजिंक्य हेमंत पाटील - नाशिक – रेडिओ ऍस्ट्रॉनॉमि विषयात संशोधनासाठी नेदरलँड्स येथे १२ कोटीची शिष्यवृत्ती मिळवणारा एकमेव भारतीय युवा (जानेवारी २०१५)*

*(८ ) अभिषेक निर्मल हुंबड - बंगलोर – जागतिक स्तरावर तीस वर्षाखालील तीस प्रतिभावान व्यक्तींमधे एक स्थान मिळविणारा एकमेव भारतीय युवा अभियन्ता. (जानेवारी २०१५)*

*वर्ष ४ थे : (९ )  सचिन बंडोपंत तळेकर - राधानगरी, कोल्हापूर – प्रदूषणावर मात करण्यासाठी जैव तंत्रज्ञानात उल्लेखनीय संशोधन करणारा युवा वैज्ञानिक (जानेवारी २०१६)*

\- ३ -

*(१० ) सायली मकरंद चुरी - माहीम, मुंबई – विदेशी भाजा व फळे लागवडीच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारी कृषितद्न्य युवती (जानेवारी २०१६)*

*वर्ष ५ वे : (११ ) विराज विनायक रानडे : नाशिक – पर्यावरण रक्षणार्थ लोकोपयोगी संशोधन करणारा युवा वैज्ञानिक (जानेवारी २०१७)*

*(१२ )  जान्हवी विलास लोकेगावकर : चेंबूर, मुंबई – राष्ट्रीय सेवा योजना गटाचे, दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी राजपथावर संचालनाचे नेतृत्व करणारी युवती (जानेवारी २०१७)*

*वर्ष ६ वे - : (१३ ) रुपाली रवींद्र माली - सोनगीर, धुळे. एका सामान्य गरीब शेतकरी कुटुंबातील रुपाली माळीने युवक कल्याण आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल युवा पुरस्काराचा मान. (जानेवारी २०१८)*

*(१४ )  प्रथमेश सोमा हिरवे - पवई, मुंबई. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आलेल्या प्रथमेशने भारतीय अंतरिक्ष संशोधन अनुसंधान मधील संशोधनासाठी स्वतःची गुणात्मक योग्यता अधोरेखित करत सोळा हजार अभियंता उमेदवारांतून पाचव्या क्रमांकाची निवड मिळविली. (जानेवारी २०१८)*

*वर्ष ७ वे - : (१५)  आदित्य दिनकरराव कुलकर्णी - परभणी :  तंत्रज्ञानाच्या योग्य वापराने आरोग्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय संशोधनाबद्दल आदित्यला जागतिक आरोग्य संघटनेने तसेच ब्रिटनच्या राणी एलिझाबेथने सन्मानित केले आहे असा युवा वैज्ञानिक. (जानेवारी २०१९)*

*(१६ ) अमोल शिवाजी राठोड - परभणी, जिल्हा अहमदनगर - :  अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ग्रामीण भागातील अनाथ, निराधार बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या रचनात्मक योगदानाबद्दल आदिवासी, बंजारा, कातकरी*

*समुदायातील बालकांसाठी अनेक उपक्रम राबवल्याबद्दल साने गुरुजी युवा पुरस्कारने सन्मानित. (जानेवारी २०१९)*



*<u>वर्ष ८ वे</u> : (१७) रोहिणी अनुराधा नरेंद्र जोशी - पुणे - जागतिक पातळीवर महिला गणित ऑलिम्पियाड मध्ये भारताला प्रथमच रौप्य पदकाचा सन्मान मिळवून देऊन स्वतःची गुणात्मक योग्यता अधोरेखित करणारी पहिले मराठी संशोधक युवती. रोहिणीला साने गुरुजी युवा वैज्ञानिक पुरस्काराने सन्मानित करण्या आले. (जानेवारी २०२०)*

*(१८) तन्वीर तमन्ना अस्लम इनामदार - पुणे - तंत्रज्ञानातील संशोधनाचे कौशल्य समाजोन्नतीसाठी वापरून केलेल्या समाजकार्यातील भरीव योगदानाबद्दल युवा वैज्ञानिक पुरस्कार देण्यात आला. तन्वीरला संयुक्त राष्ट्र द्वारा कर्मवीर चक्र आणि युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मागील तीन वर्षात तन्वीरने पेटंटसाठी एकापेक्षा अधिक अर्ज दाखल केले आहेत. (जानेवारी २०२०)*

******************************************